# रक्ताळलेली अंगठी

गुरुनाथ नाईक

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B265

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**रक्ताळलेली अंगठी : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

रक्ताळलेली अंगठी / ५
भूमिगत दरोडा / ६९

# रक्ताळलेली अंगठी

# १

मंडलगडच्या उत्तरेला पाच ते सहा कोसांवरची ती ओसाड अशी गढी. चक्रवर्ती राजे-महाराजे जसजसे कमी झाले; तसतसे त्यांचे अशा दुर्गम गढ्यांकडे आणि वाड्यांकडे दुर्लक्ष होऊ लागले.

त्यातीलच ही एक गढी काळाचे ठोके मोजत उभी होती. तिची काळजी कुणीही घेत नव्हते. काळजी घेणारेही कुणी नव्हते.

त्या गढीच्या सभोवताली दुर्गम अशी पहाडी होती... घनदाट असे रान होते. दिवसाढवळ्यादेखील त्या दुर्गम भागातून फिरणे धोक्याचे वाटत होते. जीवघेण्या आणि हिंस्त्र श्वापदांनी ते व्यापले होते. हिंस्त्र श्वापदांनाही सळो की पळो करून सोडणारे अक्राळविक्राळ देहाचे अजगर झाडाफाद्यांना वेटोळा घालून सुन्नपणे भक्ष्याची वाट पाहत पडलेले असायचे.

शांत वातावरणात गढीतून एक जोरदार किंकाळी बाहेर पडली आणि गर्द झाडीतून जाणारा एक घोडेस्वार जागच्या जागी थबकला. त्याने नीट कानोसा घेतला... किंकाळी कोणत्या दिशेने आली असावी, याचा त्याने अंदाज घेतला.

पुन्हा त्याने गढीच्या रोखाने चालायला सुरुवात केली. किंकाळी ऐकली आणि त्याच्यात आपोआप सावधगिरी निर्माण झाली.

तो घोडा अतिशय दमदार होता. काळ्या रंगावर कुठेही दुसरा बारीकसादेखील ठिपका नव्हता. घोडेस्वार इतक्या भयाण भागातून चालला

होता; पण त्याच्याकडे कोणतेही हत्यार नव्हते. बंदूक सोडाच; साधा भालादेखील नव्हता.

त्याने घोडा गढीच्या तोंडाजवळच सोडून दिला. घोड्याला बांधण्याचा धोका पत्करायला तो तयार नव्हता. आपण घोड्याला बांधले आणि एखाद्या हिंस्र जनावराने त्याच्यावर हल्ला केला, तर त्याला स्वत:चे संरक्षण तरी करता यावे, असा विचार करून स्वाराने आपल्या घोड्याला तसेच मोकळे सोडले होते.

शांत वातावरणात पुन्हा एकदा किंकाळीचा आवाज घुमला. गढी चढण्याच्या तयारीत असलेला तो माणूस जागच्या जागी थबकला. शांत वातावरणात तो आवाज अगदीच जवळ घुमल्यासारखे त्याला वाटले.

सावकाश त्याने गढी चढायला सुरुवात केली. चढणे वाटते तितके सोपे नाही, याची जाणीव त्याला झाली. कित्येक शतकांत त्या गढीची कुणीही काळजी घेतलेली नव्हती. ओबडधोबड दगड इतस्तत: पडलेले होते. त्या दगडांतून कशीबशी वाट काढत तो वर चढत होता.

जेव्हा त्याने कशीबशी अर्धी वाट कापली, तेव्हा कुणाचे तरी रागाचे बोलणे त्याच्या कानात शिरू लागले. कुणीतरी कुणाला दमदाटी करत होते. कदाचित एखाद्या व्यक्तीचा त्या ठिकाणी छळ चालला असावा, असेही त्याला वाटत होते.

आपल्याकडे कुणाचेही लक्ष नाही, याची पुन्हा त्याने खात्री केली. लख्ख सूर्यप्रकाशातदेखील त्या गढीत चढून जाण्याची कुणाची हिंमत नव्हती. आणि आता तर आकाश ढगाळलेले होते. सूर्य ढगाआड दडला होता. वातावरण अतिशय भयाण बनले होते.

आणि त्या भयाणतेत भर घालण्यासाठीच म्हणून की काय, किंकाळण्याचे आवाज अधूनमधून फुटत होते. दु:खावेगाने कुणीतरी ओरडत होतं आणि नि:शस्त्र असा तो तरुण हळूहळू दगडधोंड्यांच्या राशीतून गढीचा कडा चढून वर आला होता.

गढीच्या कड्यावरून मान वर करून त्याने दूरवर दिसणाऱ्या वाड्याकडे पाहिले. छळ करणारे किती जण असावेत, याचा अंदाज तो करू शकत नव्हता. एकदम पुढं जाऊन त्याला हल्लेखोरांच्या हाती सापडायचं नव्हतं.



सावधगिरी बाळगत तो तरुण वाड्याच्या रोखाने चालू लागला. त्यावेळी तो कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्याच्या जय्यत तयारीत होता. यदाकदाचित कुणीतरी सभोवताली दडून राहिले असावे असेच त्याला वाटत होते आणि म्हणूनच एकदम वाड्याकडे जाण्याचे धैर्य त्याला होत नव्हते.

वाड्याकडे जाण्याचा मार्ग चहूबाजूंनी बंद झाला होता. आडवीतिडवी झुडपे बेसुमारपणे वाढली होती. त्या झुडपांतून आवाज होऊ न देता कसाबसा मार्ग काढत तो चालला होता. अखेर शेवटी तो वाड्याच्या मागच्या भागात आला.

आणि बोलण्याचा आवाज स्पष्टपणे ऐकू येऊ लागला. कुणीतरी दुसऱ्या व्यक्तीला दमदाटी करत होते. एक एक चित्र बाहेर दडून राहिलेल्या व्यक्तीच्या डोळ्यांपुढून सरकत होते. कोण कुणाचा छळ करीत आहे, याची पुरेपूर कल्पना त्याला आली होती.

कारण, तब्बल चार दिवस तो याच लोकांच्या मागावर होता. ज्या व्यक्तीला आपण गाठण्याचा प्रयत्न करीत आहोत, त्याच व्यक्तीला आधीच कुणीतरी गाठले आहे, याची कल्पना त्याला आधीच आली होती; पण संयम राखणे जरूरीचे होते.

लढण्याची ही वेळ नव्हती आणि लढण्यासारखी ती माणसेही नव्हती. ते कुणी कुणाचे दुश्मन नव्हते. दुर्मीळ अशा वस्तूसाठी ही सारी धडपड चालली होती आणि ती मिळवण्यासाठी प्रत्येक जण आपआपल्या परीने प्रयत्न करीत होता.

पुढे जाऊन छळ करणाऱ्या व्यक्तीला गाठण्याचा मोह त्याने कसाबसा आवरला. काय काय होते ते पाहण्यासाठी तो मोक्याच्या जागी बसून राहिला.

हल्ला झालाच तर तो बसलेल्या जागेवरून कसाबसा स्वत:चे संरक्षण करू शकत होता आणि कुणी गढीतील त्या वाड्याकडे येऊ लागले, तर त्याच्याकडेही लक्ष देऊ शकत होता.

वाड्यातून येणारे आवाज थांबले. बऱ्याच वेळाने कुणीतरी वाड्याच्या बाजूला असलेल्या दारातून बाहेर पडताना त्याने पाहिले. वाडा आणि काही अंतरावरची झाडी यांच्यामध्ये असलेल्या मोकळ्या जागेत तो थांबला. त्याने आपली घारीसारखी नजर सभोवताली फिरवली आणि गढीच्या पूर्वेकडच्या भागाकडे चालायला सुरुवात केली.

दडून बसलेल्या त्या तरुणाने तिथून जाणाऱ्या राजबिंड्या व्यक्तिमत्त्वाच्या जवानाला ओळखले. वेळ दुसरी असती तर तो तरुण क्रोधाने पेटला असता; पण त्याला अजिबात राग आला नाही. कारण तोही नेमके तेच करण्यासाठी आला होता. दोघांनाही एकच वस्तू हवी होती आणि ती एकाच माणसाकडून मिळवण्याचा ते दोघेही प्रयत्न करत होते.

दडलेला तो बावळट चेहऱ्याचा आणि शिकार करताना साहेब लोक घालतात तसा वेष घातलेला तरुण डोक्यावरची भलीमोठी हॅट सांभाळत दडलेल्या भागातून कसाबसा बाहेर पडला. पुन्हा एकदा त्याने सावधगिरीने सर्वत्र नजर फिरवली. वाड्यातून बाहेर पडलेला तरुण ज्या दिशेने गेल्याचे त्याने पाहिले, त्या दिशेने त्याने कितीतरी वेळ टक लावून पाहिले.

कारण, कोणताही धोका त्याला पत्करायचा नव्हता. सर्व कामे त्याला बिनबोभाट पार पाडायची होती आणि म्हणूनच त्याला सावधगिरी बाळगत बराचवेळ थांबायचे होते.

केवळ सावधगिरी म्हणून तो बावळट देहाचा तरुण थेट गढीच्या तटापर्यंत आला. वाड्यातून गेलेली व्यक्ती त्याने गढीच्या उतारावरून खाली जाताना स्पष्ट पाहिली. चटकन त्याने मागे वळून पाहिले; पण आपण दिसू नये या हेतूने तो दोन दगडांच्या मध्ये बसून राहिला.

तो पूर्णपणे खाली गेल्याची जेव्हा त्याने खात्री केली; तेव्हा तो मागे वळला. कारण, त्याला भीती होती ती घोड्याची. आपला घोडा कुणाच्या नजरेस पडला, तर कुणीतरी गढीत आले आहे, याची त्याला जाणीव होईल आणि खाली गेलेला तो माणूस पुन्हा वर येईल, ही भीती त्याच्या मनात सारखी रेंगाळत होती.

पाहता पाहता तीही भीती पूर्णपणे नाहीशी झाली. निश्चितपणे तो वाड्याकडे परतला. ढगाळलेले आकाश आता निरभ्र बनले होते आणि कडक ऊन अंगाला चटका देत होते. तो वाड्याच्या बाजूला असलेल्या उघड्या अंगणातून आत शिरला. त्यावेळी तो पूर्वीपेक्षाही सावध होता. कदाचित आणखी कुणी त्या वाड्यात दबा धरून बसले असावे, अशी भीती त्याला वाटत होती.

अस्पष्टसा कण्हण्याचा आवाज त्याने ऐकला.



उजेडात त्याने वाड्याच्या आतील भागाकडे चालायला सुरुवात केली. साधारण साफसूफ केलेल्या अशा जागेत एक हात-पाय बांधलेला माणूस पडला होता. त्याच्या अंगावरचे सर्व कपडे फाटलेले होते. शरीराला बऱ्याच ठिकाणी जखमा झाल्या होत्या. कुणीतरी त्याचे अतिशय हाल केले आहेत, हे स्पष्ट दिसत होते.

कुणाची तरी चाहूल लागताच त्या हात-पाय बांधलेल्या माणसाने मान वळवली. आलेल्या अगंतुकाकडे त्याने पाहिले. अस्पष्टशा उजेडात दोघांनीही एकमेकांकडे चमकून पाहिले. दोघांनाही एकमेकांची अस्पष्टशी ओळख पटली.

'चौहान' कसबसे त्या जखमी माणसाच्या तोंडून शब्द बाहेर पडले. आवाज अनोळखी वाटला. उभा असलेला माणूस झटक्यात खाली वाकला. त्यालाही जखमी माणसाची पूर्ण ओळख पटली.

'समशेर?' चौहानच्या तोंडून शब्द बाहेर पडले. घाईघाईत चौहानने खिशातून चाकू काढला. हाता-पायांचे बंद सटासट तोडले. खाली पडलेल्या समशेरला उठवून बसवले.

बोलण्यासारखी ती परिस्थिती नव्हती. हाच माणूस आपल्याला पाहायला मिळेल, यावर उदयसिंह चौहानचा अजिबात विश्वास नव्हता. हळूहळू सर्व काही माहिती मिळवता येईल, हा विचार करून उदयसिंह चौहान गप्प बसला होता.

गावात तो नवीनच होता. जरी तो थकलेला दिसत असला, तरीही त्याचा चेहरा ताजातवाना आणि निश्चयी वाटत होता. त्याचा दमदार घोडादेखील थकल्यासारखा झाला होता. कुठेतरी तो आसरा शोधत होता्

कदाचित तो त्या गावात नवीनच असावा. मंडलगड हे इतस्तत: पांगलेले आणि असे गाव होते. एक घर इकडे तर एक तिकडे, अशी या गावाची अवस्था होती. त्यावेळी सूर्य बराच पश्चिमेकडे झुकला होता.

उन्हाने तापून निघालेला तो घोडेस्वार कसाबसा एका भव्य अशा वाडयाच्या प्रवेशद्वाराजवळ आला. घोड्यावर बसूनच त्याने त्या वाड्याची नीट तपासणी केली. दोन पावले पुढे टाकून त्याने भव्य अशा तटाच्या दाराजवळ असलेली दोरी खेचली. तटाच्या आत बऱ्याच दूरवर घंटानाद झाला.

काही वेळाने उंच आणि रूंद अशा त्या दरवाजाचा दिंडी दरवाजा उघडला गेला. एक मुंडासे बांधलेले डोके बाहेर आले.

‘कुठून आलात?’ कठोर आवाजात त्या मान बाहेर काढलेल्या पहारेकऱ्याने विचारले.

‘वाटसरू आहे... एक दिवसाचा मुक्काम मला करायचा आहे.’ थकलेल्या आवाजात तो घोडेस्वार बोलला. थोडे थांबायला सांगून त्या पहारेकऱ्याने दिंडी दरवाजा पुन्हा बंद केला. बराच वेळ शांततेत निघून गेला आणि हळूहळू भला मोठा दरवाजा उघडण्यात आला.

उघडलेल्या भव्य दरवाजातून कठोर चेहऱ्याचा आणि सरदारी बाण्याचा जवान बाहेर आला. त्याने घोड्यावरून खाली उतरणाऱ्या तगड्या; पण वय बरेच असलेल्या त्या माणसाकडे रोखून पाहिले.

काही विचारून माणसाची पारख करण्याची ती वेळ नव्हती. दुष्ट हेतूनेच यायचे झाले तर कुणीही काहीही खोटे सांगू शकत होता. अगदी नात्यातील माणसांची नावे सांगूनदेखील कुणीही वाड्यात स्वत:चा शिरकाव करून घेऊ शकत होता.

‘आत या.’ दमदार आवाजात त्या तगड्या जवानाने हुकूम सोडला. त्या जवानाने घोडेस्वाराला पारखले होते. आलेला घोडेस्वांर खानदानी घराण्यातला आहे, याची कल्पना त्याला येऊन चुकली होती.

‘किती दिवस राहणार?’ चालता चालता त्या जवानाने विचारले.

‘फारतर दोन दिवस.’ घोडेस्वाराने उत्तर दिले. घोडेस्वाराचा आवाज हुकमी होता. त्या आवाजात जरब होती. तो कुणीतरी सरदार असावा किंवा सरदार घराण्यातील असावा, हे त्या जवानाच्या लक्षात आले होते.

‘याच गावात आलात का जाता जाता कुठे विसावा?’

‘आलो याच गावात. थोडं काम होतं. ते करून लगेच जाईन, जयपूरला.’ सरदाराने उत्तर दिले.

‘आपण कुणापैकी?’

‘ठाकूर रणजितसिंह.’

‘वाड्याच्या बाजूला असलेलं हे आमचं अतिथीगृह.’ एका शानदार घराकडे बोट दाखवत जवानाने माहिती द्यायला सुरुवात केली.

‘हा वाडा कुणाचा?’ आलेल्या पाहुण्याने विचारले.

‘शेरसिंहांचा. सरदार शेरसिंहांचं नाव आपण ऐकलंच असेल, मी त्यांचा मुलगा समशेरसिंह.’



आलेल्या पाहुण्याने अतिथीगृहात जाता जाता आजूबाजूच्या वैभवावरून नजर फिरवली. एकेकाळी हा वाडा वैभवाने गर्जत होता, हे वाड्याचे आताचे अवशेष साक्ष देत होते; पण आता त्या वाड्यात काहीही राहिले नसावे, हे दुर्दशा पाहून लक्षात येत होते.

अगदी धूर्तपणे तो या वाड्याच्या आश्रयाला आला होता; पण इथे येण्यात आपण काहीतरी चूक केली आहे. असेच त्याला राहून राहून वाटत होते; पण तरीही तिथून पाय मागे घ्यायला त्याचे मन तयार नव्हते. जे आपल्याला हवे ते कदाचित आपल्याला याच वाड्यात सापडेल, असा विचार त्याच्या मनात सारखा डोकावू लागला.

थोड्याच वेळात समशेरने पाणी आणून दिले. आलेल्या पाहुण्याने हात-पाय धुतले. लगेच फराळाचे सामान समोर आले. आणि या घराण्यातील खानदानी आदरातिथ्य नष्ट झालेले नाही, याची खात्री पाहुण्यांना झाली.

‘समशेरसिंह, विचारतो म्हणून रागावू नका... या घराण्यात दुर्मिळ अशी एक हिऱ्याची अंगठी आहे, असं मी ऐकलं होतं.’ पाहुण्याने हळूच विषयाला हात घातला; पण कदाचित पाहुण्याचा धूर्तपणा त्या तरुणाच्या लक्षात आलाही नसावा.

‘हो... आम्हीही त्या अंगठीची कथा ऐकत होतो. एकेकाळी पिताजींनीदेखील ती कथा ऐकली होती.’ समशेर काहीशा रागानेच बोलला. प्रश्न विचारणारा पाहुणा गडबडल्यासारखा झाला; पण त्याने चेहऱ्यावर तसे अजिबात दर्शवू दिले नाही. आपण काही भलतेसलते ऐकलेले नाही, अशा अविर्भावात तो समशेरला पाहत राहिला.

‘ऐकत होतो म्हणजे? ती अंगठी तर त्या घराण्यात असायलाच हवी!’ आलेल्या पाहुण्याने ठामपणे सांगितले आणि समशेरच्या नजरेवर संतापाची एक लाट उसळून गेली. त्याच्या चेहऱ्यावर संताप का दिसावा; हे मात्र पाहुण्याच्या अजिबात लक्षात आले नाही. ती कथा खोटी आणि नसलेल्या अंगठीला भलतेच महत्त्व आलेले पाहूनही कदाचित तो संतापला असावा, असा विचार पाहुण्यांनी केला.

त्यावेळी सूर्य बराच पश्चिमेकडे झुकला होता. बोलण्याच्या ओघात सरदार शेरसिंह अंथरुणाला खिळून आहे, हे पाहुण्याला समजले होते आणि पाहुण्यांच्या